**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात.**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. ५९/२०२२**
**निशाणी क्र. ३२ खालील आदेश**

(महादेव वि. वसंत व इतर )

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे विरुध्द पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेत यावा यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, सदर दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २६ कुंडलिक नारायण जाधव हे दि. २२.०२.२०२२ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. २६ यांना जवळचे वारस म्हणून पत्नी, मुलगा, मुलगी असे वारस आहेत. सदर वारस अभिलेखावर घेण्यास ११ महिन्यांचा विलंब झाला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी क्र. २६ विरुध्द दावा अबेटचा आदेश पारीत झालेला आहे. सदर आदेश रद्द होणे आवश्यक आहे. तरी मयत प्रतिवादी क्र. २६ यांचे विरुध्द पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादी क्र. ९ ते ११ तर्फे म्हणणे देऊन त्यांनी असे कथन केले की, अर्जातील मजकुर खोटा आहे. अर्जात कारण नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे अभिलेख तपासून पाहिले असता वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र. २६ हे दि. २२/०२/२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादीने नि. ३१ कडे मयत प्रतिवादी क्र. २६ यांचा मयत दाखला हजर केला आहे. त्यामुळे त्यांचे वारस या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक आहे. सदर प्रतिवादी

यांचे विरुध्द दावा अबेटमेंटचा आदेश पारित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा वाटप व निरंतर ताकीद मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रतिवादी यांचेविरुध्द पारीत झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. जर प्रतिवादीचे वारसांना मयत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, वादीच्या कृत्यामुळे प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, परंतू सदरची बाब ही वादीवर आर्थिक भूर्दंड लादल्यानंतर काहीअंशी कमी करता येवू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

१. अर्ज (नि.३२) वादीने रक्कम रु. ५००/-(रु. पाचशे मात्र) दंड प्रतिवादी यांना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २६ विरुध्द झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2023.10.07 13:47:26 +0530

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)

दिनांक – ०७/१०/२०२३. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,

सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/10/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 07/10/2023 |